बाई, जन्माचे धिंडोडे
सांगू कसे, झाकू कसे?
चुलीतल्या गोवारीला
चुलीमंधी जाळायचे ।

पानंगळल्या झाडांचे
दु:ख सांडले आकाशी
माझ्या घरट्याच्या दारी
माझे पाय वनवासी ।

काडीमुडीचा संसार
कसे बांधू मी गाठोडे
निळ्या डोळ्यांच्या काठाशी
समिंद्राला गेले तडे ॥

**ना.धो. महानोर**